लोकमत 29/03/2025

# अवैध धंद्यांच्या विरोधात पोलिस 'ॲक्शन मोड'वर

## अर्धापूर पोलिसांची मोहीम : गैरप्रकारांची माहिती देण्याचे आवाहन

लोकमत न्यूज नेटवर्क

**अर्धापूर :** तालुक्यातील गावोगावी सुरू असलेल्या अवैध व्यवसायांना आळा घालण्यासाठी अर्धापूर पोलिस प्रशासनाने मोहीम हाती घेतली आहे. परिसरातील गैरप्रकार रोखण्यासाठी विशेष पथक स्थापन करण्यात आले आहे. अवैध धंद्यांची माहिती देणाऱ्यांची नावे गुप्त ठेवण्यात येणार आहेत. हे धंदे बंद करण्यासाठी लोकसहभाग वाढावा, हा यामागे उद्देश आहे. त्यासाठी तंटामुक्त समिती, पोलिस पाटील, सामान्य नागरिकांना माहिती देण्याचे आवाहन असलेले भित्तिपत्रक गावोगावी, सार्वजनिक ठिकाणी लावण्यात येत आहे.

अर्धापूर पोलिस ठाणे हद्दीतील गावांमध्ये अवैध दारूमुळे अनेक कुटुंबे उद्ध्वस्त झाली. तर अनेक ठिकाणी शाळा-महाविद्यालय परिसरातच पानटपऱ्या थाटल्या आहेत. अवैध व्यवसायांच्या शाखाच ठरत आहेत. अवैध धंदे वाढत असल्याने रस्त्यावरील अपघातासह गुन्हेगारीच्या घटनांमध्येही मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे.



### गुन्हेगारी रोखण्यात लोकसहभाग वाढावा

अर्धापूर पोलिस ठाण्याच्या हद्दीत अवैध धंदे आणि गुन्हेगारीला आळा बसावा, यासाठी लोकांनी पुढाकार घ्यावा, ही अपेक्षा आहे.

त्यामुळेच हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. गावागावात पत्रकाद्वारे पोलिसांचे मोबाइल क्रमांक देण्यात आले आहे. नागरिकांनी त्यावर माहिती द्यावी, असे आवाहन पो.नि. चंद्रशेखर कदम यांनी केले.

### माहिती देणाऱ्यांचे नाव ठेवणार गुप्त

प्रत्येक गाव, प्रत्येक शाळांचा परिसर या अवैध प्रकारापासून मुक्त व्हावा, यासाठी अर्धापूर पोलिसांनी विशेष मोहीम हाती घेतली आहे. पोलिस निरीक्षक चंद्रशेखर कदम यांनी पदभार स्वीकारल्यापासून हद्दीत विविध मोहिमा राबविल्या आहेत.

काही दिवसांपूर्वी 'स्वच्छ सुंदर पोलिस ठाणे' हा उपक्रम राबविण्यात आला. आता संपूर्ण तालुका अवैध धंदे मुक्त करण्यासाठी त्यांनी विशेष मोहीम हाती घेतली आहे.

यासाठी एक विशेष पथक स्थापन करण्यात आले असून, पोलिस पाटील, तंटामुक्ती अध्यक्ष यांची बैठक पोलिस ठाण्यात घेण्यात आली. टोल फ्री नंबर असलेले पत्रक जाहीर करून अवैध धंद्यांची माहिती देणाऱ्यांचे नावही गुप्त ठेवले जाणार आहे.

# पीएम श्री शाळेचा वीजपुरवठा तोडला